


# गुरु दक्षिणा

लेखक-अनिल वाकणकर



# गुरूदक्षिणा

अनिल अनंत वाकणकर

ई साहित्य प्रतिष्ठान

# गुरूदक्षिणा

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

गुरूदक्षिणा

लेखकाचे संपूर्ण नांव:- अनिल अनंत वाकणकर.

पत्ता:- श्रीमंत पेशवे मार्ग, श्रीवर्धन, जिल्हा रायगड, ४०२११०.

Email-aawakankar@gmail.com

Mobile: 9011857414

ब्लॉग : https://aawakankar.blogspot.in/

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पूनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २२ एप्रिल २०१९

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

## लेखकाचा परिचय



संपूर्ण नांव:- अनिल अनंत वाकणकर.

पत्ता:- श्रीमंत पेशवे मार्ग, श्रीवर्धन, जिल्हा रायगड, ४०२११०.

मोबाईल क्रमांक:- ९०११८५७४१४

वाचना संबधी:- गेली जवळपास ४० वर्षे अनेक प्रकारची पुस्तके वाचली. त्यातल्यात्यात कांदबरी हा प्रकार जास्त आवडीचा. योगिनी जोगळेकर, वि. स. खांडेकर, बाबा कदम, रणजित देसाई हे लेखक जास्त आवडीचे. श्रीवर्धन येथे वाचनालयात उपलब्ध असणाऱ्या जवळपास सर्वच कादंबऱ्या वाचल्या आहेत. या शिवाय समर्थ रामदास स्वामींचे सर्व वाङ्मय, प. पू. पांडुरंग शास्त्री आठवले याची प्रवचने या अंगाचे वाचनही आवडीचे आहे.

स्वत:चे लेखन:- समर्थ रामदास स्वामींनी याला किर्तन भक्ती असे नांव दिले आहे. आपण जे जे वाचले आहे त्यातले जे आकलन झाले ते स्वत: जवळ न ठेवता दुसऱ्याला सांगणे ही एकप्रकारची किर्तन भक्तीच आहे. हल्लीच जागतिक पर्यावरण दिनाच्या मुहूर्तावर माझी वृक्ष मंदिर ही कादंबरी ई साहित्य प्रतिष्ठान द्वारे प्रकाशित झालीआहे. तरीही मी एक प्रवास वर्णन, तिन कथा लिहील्या आहेत. हे सर्व साहित्य माझ्या https://aawakankar.blogspot.in/ या ब्लॉगवर उपलब्ध आहे.







श्री अनिल वाकणकर यांची पूर्वप्रकाशित पुस्तके
www.esahity.com येथे विनामूल्य उपलब्ध.









# गुरु दक्षिणा

## भाग १

अजय, अतुल, मानसी आणि घनश्याम हे हायस्कूलपासुन एकमेकांचे जिवलग दोस्त. अजयने सॉफ्टवेअर मध्ये डिग्री केली. अतुलने सि ए केले. मानसी गायनालॉजिस्ट होती. घनश्यामला देसाईला घरच्या परिस्थितीने जास्त शिकता आले नाही. तशी सगळयांच्याच घरची आर्थिक परिस्थिती चांगली होती. चौघेही चिपळुणच्या परशुराम हायस्कूलमध्ये पाचवी ते दहावी पर्यत शिकले होते. चौघेही सध्या वेगवेगळया ठिकाणी रहात होते तरीही त्यांचा एकमेकांशी सतत संपर्क चालूच होता.

चौघेही १९९५ मध्ये परशुराम हायस्कूल मधुन १०वी पास झाले होते. अजय सध्या मुंबई येथे एका अमेरीकन कंपनीमध्ये सिनिअर सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून काम करित आहे. अतुलची पुण्याला स्वत:ची टॅक्स कनस्लटंटची फर्म आहे. मानसीचे अलिबाग येथे स्वत:चे हॉस्पिटल आहे. घनश्यामने वडिलार्जित जमिनीमध्ये परशुरामजवळ स्वत:चे फार्म हाऊस आणि पर्यटकांसाठी अद्ययावत रिसॉर्ट सुरु केलेल्याला आता १० वर्षे झालीत.

एकुणच सर्वजण आर्थिक बाबतित सुस्थितित आहेत. सर्वांची लग्नकार्य होऊन कौटुंबिक बाबतीतही ते सर्वजण आता स्थिरस्थावर झालेले आहेत. वर्षातुन एकदातरी या चार फॅमिली कोणा एकाकडे एकत्र जमतात. त्या निमित्ताने शाळेतल्या आठवणींना उजाळा देतात आणि परत आपापल्या उद्योग धंद्याला लागतात. प्रत्येक वेळी वर्गातल्या कोणा कोणाच्या आठवणी निघतात. कोण सध्या कुठे आहे, काय करतोय याचा आढावा घेतला जातो.

गेल्या वर्षी घनशामच्या फार्म हाऊसवर सर्वजण जमले होते तेव्हा मानसीने एक कल्पना मांडली होती. ती म्हणत होती आजकाल १० वीच्या १२ वीच्या क्लासमेटच गेट टुगेदर अॅरेंज केले जाते. आपणही आपल्या १९९५ च्या १०वी च्या वर्गाचे गेट टुगेदर करुयात. त्यावर सगळयांना ही कल्पना आवडली होती. परंतु हे काम सोपे नव्हते.

सर्वप्रथम सगळयांची नांवे आणि सध्याची रहाण्याची ठिकाणे आणि संपर्काची साधने फोन नंबर, पत्ता शोधायला हवा होता. सगळयांत मोठी अडचण मुलींच्या संपर्काची होती कारण त्या सगळयांची आता लग्ने झालेली होती. त्यामुळे त्यांना आता नविन नावाने शोधायला हवे होते. ही

जबाबदारी सगळ्यांनी मिळुन घनश्यामच्या गळयांत टाकली. कारण तो परशुराम हायस्कूलच्या परिसरांत रहाणारा होता. एवढेच नाही तर तो परशुराम हायस्कूलच्या संचालक मंडळात देखिल होता. सर्वप्रथम सगळया सहअध्यायिंसोबत संपर्क स्थापित करण्याचे ठरविण्यांत आले. त्याकरिता सोशल नेटवर्कचा वापरही करण्याचे ठरले. आणि ती जबाबदीरी अजयने स्वत:हून आपल्यावर घेतली.

ताबडतोब अजयने व्हॉटस् अँपवर एक ग्रुप स्थापन केला. जसजसा संपर्क होईल तसे एकेकाला ग्रुपवर मेंबर करायला सुरवात करायचे ठरले. मानसीने फेसबुकच्या माध्यमातुन शोध घेण्याचे ठरवले. सर्वांनी आपापल्या परीने शोध मोहिम सुरु ठेवण्याचे ठरवुन सर्वजण आपापल्या दैनंदिन उद्योगासाठी गांवी निघुन गेले.

बघता बघता सहा महिने निघुन गेले. घनश्यामने शाळेंतुन सहाध्यायांच्या नांवाची यादी मिळवली. त्या त्या व्यक्तिच्या घरी संपर्क करुन त्यांचे पत्ते, फोन क्रमांक मिळवायला सुरवात केली. ते फोन नंबर अजयकडे पाठवले. त्यापैकी जे व्हॉटस् अँप वापरत होते त्यांना ग्रुपमध्ये अँड केले. जे वापरत नव्हते त्यांना मेसेज पाठवुन व्हॉटस् अँप वापरायची सुचना केली. मानसीनेही आपल्या हॉस्पिटलच्या व्यापातुन रोज कमित कमी एक तास वेळ काढुन फेसबुकवर शोध मोहीम सुरु ठेवली. या सगळया प्रयत्नांचे फलित म्हणजे आता त्यांचा ३५ पैकी ३२ सहाध्यायांशी प्रत्यक्ष संपर्क झाला होता. त्यापैकी ३० जण आता व्हॉटस् अँपवर रेग्युलर चॅटींग करीत होते. राहिलेल्या तिघांचा शोध सुरु होता. पण आता शोध घेणारे चौघे नाही तर बत्तीसजणं होते.

या बत्तीसांपैकी चौघे परदेशी होते. सहाजणं महाराष्ट्राच्या बाहेर होते. बारा मुंबईत तर सहाजण पुण्यात होते. बाकीचे असेच विखुरलेले होते. मात्र सोशल नेटवर्कमुळे सर्वजण आता एकमेकांच्या संपर्कात होते. आतापर्यंत सर्वांना आपण एकत्र जमले पाहिजे ही कल्पना मान्य झालेली होती. त्यामुळे गेट टुगेदर करायचेच हे फायनल झाले. फक्त कधी आणि कुठे हा मोठा प्रश्न होतो. त्यावर घनश्यामने चिपळुणला आपल्या हायस्कूल मध्येच घ्यायचे हे ठामपणाने सांगितले. त्यामुळे कुठे हा विषय निकालात निघाला. राहीला प्रश्न कधी तो देखिल सुटला. कारण मानसीने प्रस्ताव ठेवला की, पावसाळयातच करुया कारण त्या वेळी केल्यास वर्षा सहलीचा आनंदही घेता येईल. तो प्रस्ताव ही सर्वमान्य झाला.

अखेरीस लावणीची कामे आटोपली की जुलैच्या अखेरीस केव्हातरी हा कार्यक्रम करायचे कायम करण्यांत आले. नेमकी कोणती तारीख ठरवायची याचा अधिकार घनश्यामला देण्यांत

आला, कारण सर्व व्यवस्था त्यालाच बघायला लागणार होती. घनश्यामने रिसॉर्टचे बुकींग तपासले, कामाला येणा-या माणसांचा अंदाज घेतला. येणा-या सर्वांची व्यवस्था रिसॉर्टवरच करायची ठरवुन त्याने ३१ जुलै ही तारीख कायम केली.

शाळेचे त्यावेळचे मुख्याध्यापक, शिक्षक यांना विशेष निमंत्रणे पाठविण्यात आली. परत एकदा चौघे मित्र एकत्र जमले. कामाच्या जबाबदा-या ठरवल्या गेल्या. कार्यक्रम पत्रिका तयार करण्यांत आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करण्याची जबाबदारी मानसीवर टाकण्यांत आली. बजेट ठरवण्यांत आले. सर्व पाहूणे ३० जुलैला संध्याकाळपर्यंत जमा होतिल आणि सोमवारी १ ऑगस्टला सकाळी चहापाणी करुन जातील असे वेळापत्रक ठरविण्यांत आले.

शेवटी शेवटी राहिलेल्या दोघांशीही संपर्क झाला. अशा त-हेने मे महीन्याच्या सुरवातिलाच ग्रुपवर सविस्तर माहिती देण्यांत आली. त्यामध्ये चिपळुणच्या रेल्वेचे टाईम टेबलही देण्यांत आले जेणेकरुन प्रत्येकाला रिझर्वेशन करणे सोईचे व्हावे. मे महिन्याच्या अखेर पर्यंत सर्वांचे कार्यक्रमाला उपस्थित रहाणार असल्याचे कन्फर्म मेसेज आले. सोबत ठरलेल्या प्रवेश शुल्काच्या रक्कमेचे चेक देखिल आले.

********

## भाग २

आज दिनांक ३१ जुलै २०१६, आज वातावरण पूर्णपणे पावसाळी झाले आहे. कालपासुनच पाऊस अक्षरश: कोसळत होता. चिपळुण शहराच्या सखल भागात सगळीकडे पाणीच पाणी झाले होते. घनश्याम देसाईच्या मालकीचे परशुराम येथिल “कोंकण रिसॉर्ट” कालपासुनच गजबजले होते. ठरल्याप्रमाणे १९९५ च्या परशुराम हायस्कूलच्या १०वीच्या वर्गातले ३५ पैकी ३३ विद्यार्थी कालच हजर झाले होते. त्यावेळच्या सहाध्यायांच्या बरोबरीने तेव्हा मुख्याद्यापक असलेले पेंडसे सर देखिल आपल्या नातवाला बरोबर घेऊन आवर्जुन आले होते. ते देखिल कोंकण रिसॉर्टवरच उतरले होते.

मानसी आपले पति डॉ. माधवराव पाटील आणि मुलांसह आली होती. अतुलही पुण्याहून आपल्या पत्नीसह आला होता. अजयने आपली पत्नी मनालीसह दोन दिवस आधीच कोंकण रिसॉर्टवर मुक्काम ठोकला होता. आजच्या कार्यक्रमाचे नियोजन त्याने आणि घनश्यामने मिळुन गेल्या दोन दिवसात फायनल केले होते. त्यांच्या काळात असलेल्या शाळेच्या वेळापत्रकानुसार पूर्णवेळ ते सर्वजण शाळेंत काढणार होते.

कोंकण रिसॉर्टच्या लॉनवर मोठा मांडव घातलेला होता. पावसापासुन संरक्षण व्हावे म्हणून वरती हिरव्या रंगाचे ट्रान्सपरंट पत्रे घातले होते. त्यामुळे मंडप तेथिल निसर्ग सौंदर्याशी अगदी मिसळुन गेला होता. आजुबाजुला गर्द हिरवाई होती जोडीला पावसाची बरसात सुरु होती. वातावरण एकदम कोंकणी होते. या मंडपातच चहा नाश्त्याची टेबल लावली होती. जमलेले सर्व वर्गमित्र आपल्या जुन्या आठवणींना उजाळा देत होते. सगळयांच्याच शारिरीक आणि सांपत्तीक स्थितीत खूपच फरक पडलेला होता.  हसत खेळत गप्पा मारत चहा नाश्ता झाल्यानंतर सर्वजण नियोजित कार्यक्रमासाठी परशुराम हायस्कूल कडे रवाना व्हायला सुरवात झाली.

*******

परशुराम हायस्कूल हे चिपळुण शहराच्या तसे एका बाजुलाच होते. एका छोट्याशा टेकडीवरील विस्तिर्ण आवारात ते पसरले होते. त्या टेकडीच्या माथ्यावरचा सर्व भाग हायस्कूलने व्यापला होता. शाळेत जाण्याकरीता वळणावळणाचा एक खास रस्ता तयार केलेला होता.

जांभ्या दगडांच्या पाखाडीचा हा रस्ता आणि टेकडीच्या माथ्यावरची हायस्कूलची दोन मजली जांभ्या दगडांची इमारत लांबुन पाहीली तरी खूप सुरेख दिसत असे. त्यातच कालपासुन तुफान पाऊस पडत असल्याने सर्व परिसर अगदी स्वच्छ दिसत होता. आजुबाजुच्या हिरव्यागार निसर्गाच्या पार्श्वभूमीवर लाल चूटुक रस्ता आणि लाल लाल दगडांची हायस्कूलची कावेने आणि चुन्याने रंगवलेली इमारत लोभसवाणी वाटत होती.

शाळेचे गेट नारळाच्या झावळयांनी आणि झेंडुच्या माळांनी सजविले होते. स्पीकरवर मंद आवाजात बिस्मिल्ला खान यांच्या शहनाईचे सूर ऐकु येत होते. एकुणच सर्व वातावरण मंगलमय झाले होते. त्यातच कालपासुन मुसळधार पडत असलेल्या पावसाने विश्रांती घेतली होती आणि आकाशात सूर्यनारायणाने आपले दर्शन दिले होते. शाळेच्या आवारात सगळी लगबग सुरु होती. अजय, अतुल, मानसी आणि घनश्याम हे सर्व तयारी योग्य पद्धतीने झाली आहे का नाही याचा आढावा घेत होते. सर्व गोष्टींची खातरजमा करुन घेत होते.

बरोबर अकरा वाजता श्रीपती पवार यांनी शाळा भरण्याची घंटा वाजवली. श्रीपती पवार हे १९९५ मध्ये परशुराम हायस्कूल मध्ये शिपाई होते आणि तेच त्यावेळी पहीली शाळा भरण्याची बेल वाजवत असत. पाच वर्षापूर्वीच ते सेवानिवृत्त झाले होते. सध्या ते आपल्या मुलाबरोबर पठाणकोट येथिल मिलिटरी कॅंटोन्मेंट मध्ये रहातात. परंतु आजच्या कार्यक्रमाकरीता खास ते येथे आले होते. त्यांच्या बेल वाजवण्याने आजच्या कार्यक्रमाची सुरवात झाली.

शाळेच्या गेटमध्ये हायस्कूलचे सध्याचे मुख्याध्यापक श्री आनंद लिमयेसर उभे होते. त्यांच्या बाजुलाच शाळेचा शिपाई चिन्मय गुलाबाच्या फुलांची करंडी घेऊन उभा होता. त्यावेळच्या शाळेच्या शिस्तीप्रमाणे सर्व माजी विद्यार्थी रांगेमध्ये शाळेत येण्याकरीता उभे होते. त्या प्रत्येक माजी विद्यार्थ्याचे लिमयेसर गुलाबाचे फुल देऊन स्वागत करीत होते. विद्यार्थ्यांच्या अगोदरच १९९५ साली दहावीच्या वर्गाला शिकवीणारे शिक्षक शाळेंत हजर झालेले होते. त्यांचेही स्वागत लिमये सरांनी पुष्पगुच्छ देऊन केले होते. सर्व माजी विद्यार्थी शाळेत दाखल झाल्यावर त्यांना शाळेच्या साने गुरुजी सभागृहात जमा होण्याच्या सूचना देण्यांत आल्या.

आज साने गुरुजी सभागृह देखिल विशेष सजवले होते. व्यासपीठाच्या पाठीमागे “सन १९९५ सालच्या दहावीच्या विद्यार्थ्यांचे पहिले स्नेह संमेलन” असा खास फ्लेक्स बोर्ड लावण्यांत आला होता. सर्व सभागृहाला विद्युत रोषणाई करण्यांत आली होती. सभागृहाच्या उजव्या कोप-यांत असणा-या साने गुरुजींच्या पूर्णाकृती पुतळयाला ताज्या सोनचाफ्याच्या फुलांचा हार

घालण्यांत आला होता. त्याच प्रमाणे ज्यांच्या नांवाने हे हायस्कूल स्थापन करण्यांत आले होते त्या भगवान परशुरामांच्या मूर्तीला देखिल खास  गेदेदार गुलाबाच्या फुलांचा भला मोठ्ठा हार घातला होता. त्या फुलांच्या सुगंधाचा घमघमाट  पूर्ण सभागृहात पसरला होता. सभागृहाच्या भिंतीवर हायस्कूलची स्थापना झाल्यापासुन दरवर्षी माध्यमिक शालांत परिक्षेमध्ये प्रथम क्रमांक मिळवणा-या विद्यार्थ्यांची छायाचित्र लावण्यांत आलेली होती. अर्थात शाळा जरी १९९० साली सुरु झाली असली तरी १० वीची पहिली बॅच १९९५ चीच होती. त्याच बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचे संमेलन आज संपन्न होत होते.

सभागृहाच्या व्यासपीठावर १९९५ सालचे सर्व शिक्षक, त्यावेळचे मुख्याद्यापक श्री पेंडसेसर, सध्याचे मुख्याद्यापक श्री लिमयेसर, श्रीपती पवार, हायस्कूलच्या संचालक मंडळाचे सदस्य, सध्याचा शिक्षकवर्ग स्थानापन्न झाले होते. सर्वजण जागेवचर स्थानापन्न होताच मानसी पोडियमवर असणारा माईक हातात घेतला आणि प्रथम स्वत:चा परिचय करुन दिला. मी डॉ. सौ. मानसी विजय नाईक, सध्या मी अलिबाग येथे माझे पती श्री विजय गजानन नाईक यांच्या जोडीने नाईक नर्सिंग होम चालवते. आज आपण याच हायस्कूल मधिल १९९५ सालच्या १०वीच्या वर्गातिल सर्व सहाध्यायी एकत्र जमलो आहोत. आपणा सर्वांचे स्वागत श्री लिमये सरांनी केलेच आहे. तरीही आपल्या ग्रुपतर्फे मी आपल्या सर्वांचे आपल्या शाळेंत स्वागत करीत आहे.

आजचा दिवस आपण आपले दैनंदीन आयुष्य विसरुन परत एकदा दहावीचे विद्यार्थी होऊया. म्हणूनच आपण सर्वजण शाळेची बेल होताच शाळेंत प्रवेश केला आहे. आपल्या शाळेच्या परंपरेप्रमाणे आता आपल्यापैकीच एक असणारी आणि सध्या गायक म्हणून टि.व्हीच्या अनेक चॅनेलवर झळकणारी आपली वर्गमैत्रीण उज्वला चिपळुणकर आपली पारंपारीक प्रार्थना सादर करणार आहे. आपण सर्वांनी विद्यार्थि म्हणून शांत चित्ताने उभे राहून ती प्रार्थना तिच्या सोबत मनातल्या मनांत म्हणूया. मी उज्वलाला विनंती करते की तिने स्टेजवर येऊन माईक आपल्या ताब्यांत घ्यावा. असे म्हणून माईक उज्वलाच्या हातात देऊन ती सर्व वर्गमित्रांच्यात जाऊन उभी राहीली.

उज्वलाने स्टेज वरील शिक्षकवर्गाला आदरपूर्वक नमस्कार करुन परशुराम हायस्कूल मध्ये दररोज प्रार्थना म्हणून म्हटले जाणारे वसंत बापट यांचे प्रसिद्ध गीत सादर करायला सुरवात केली. तिथे उपस्थित असणारे सर्वजण तिच्या सुराबरोबर ते गीत गुणगुणायला लागले.

देह मंदिर चित्त मंदिर एक तेथे प्रार्थना

सत्य सुंदर मंगलाची नित्य हो आराधना ।।

दुःखितांचे दुःख जावो ही मनाची कामना

वेदना जाणावयाला जागवू संवेदना

दुर्बळांच्या रक्षणाला पौरुषाची साधना

सत्य सुंदर मंगलाची नित्य हो आराधना ।।१।।

जीवनी नव तेज राहो अंतरंगी भावना

सुंदराचा वेध लागो मानवाच्या जीवना

शौर्य लाभो धैर्य लाभो सत्यता संशोधना

सत्य सुंदर मंगलाची नित्य हो आराधना ।।२।।

भेद सारे मावळू द्या वैर साऱ्या वासना

मानवाच्या एकतेची पूर्ण होवो कल्पना

मुक्त आम्ही फक्त मानू बंधूतेच्या बंधना

सत्य सुंदर मंगलाची नित्य हो आराधना ।।३।।

प्रार्थना गायनाने सर्वजण एका वेगळयाच विश्वात गेले. खरोखरच सर्व सहाध्यायी या प्रार्थनेने एकदम दहावीच्या वर्गातली मुले झाली. तेच सूत्र धरुन मानसीने परत कार्यक्रमाचे सूत्र आपल्या हातात घेतले. या प्रार्थनेनंतर ख-या अर्थाने संमेलनाला सुरवात झाली. मग मानसीने दुसरा माईक सभागृहातिल आपल्या सहाध्यायांकडे दिला व प्रत्येकाने आपापला सध्याच्या स्टेटस प्रमाणे परिचय करुन द्यावा म्हणून सुचवले.

माजी विद्यार्थ्यांपैकी प्रत्येकाने आपला परिचय करुन दिला. त्यामुळे सर्वांनाच आपल्या वर्गबंधु-भगिनींचा वास्तविक परिचय झाला. आपले सहाध्यायी आज निरनिराळया क्षेत्रांत अग्रेसर असलेले ऐकुन प्रत्येकालाच धन्य वाटले. सर्व सहाध्यायांचा परिचय झाल्यानंतर परत मानसीने कार्यक्रमाचे सूत्र आपल्या हातात घेतले. तिने अजय, अतुल आणि घनश्याम यांना मदतीसाठी स्टेजवर बोलावले. ते चौघेही फुलाच्या हारांच्या करंड्या आणि निरनिराळे बॉक्सेस

घेऊन स्टेजवर हजर झाले. शाळेतिल शिपायाच्या मदतिने एका ताटात या चौघांनी बरोबर आणलेल्या वस्तु काढायला सुरवात केली.

आता मानसीने बोलायला सुरवात केली. आता आपल्या सर्व सहाध्यायांच्या वतीने आपण आपल्या गुरुजनांचा पुनर्परिचय करुन घेऊ आणि त्यांच्या बद्दलाची कृतज्ञता व आदरभाव व्यक्त करण्याचे माध्यम म्हणून त्यांना मानाची शाल आणि श्रीफळ अर्पण करुयात. मी अजयला विनंती करते की त्याने आपले मुख्याध्यापक श्री पेंडसेसर यांना आपली कृतज्ञता म्हणून पुष्पहार, शाल, श्रीफळ अर्पण करावे तसेच त्यांना आपल्या या स्नेहसंमेलनाची आठवण म्हणून स्मृतिचिन्हही द्यावे. अजय त्याप्रमाणे ह्या सर्व गोष्टी केल्या व त्याने पेंडसेसरांना वाकुन नमस्कार केला तेव्हा पेंडसेसर आणि अजय या दोघांनाही आपल्या भावना आवरणे कठीण गेले. पेंडसे सरांनी अजयला अर्ध्यावरुनच वर उठवले व आपल्या मिठीत घेतले. दोघांनाही आपल्या डोळयांतील अश्रू आवरणे कठीण झाले. आणि मग त्यांनी तो प्रयत्न सोडून दिला.

अजय १९९५ च्या बॅचचा टॉपर होता. घरची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने पेडसे सरांनी त्याला जास्तीत जास्त मदत करुन त्याच्या अंगातिल गुणांना प्रकट करण्याची संधी त्याला प्राप्त करुन दिली होती.

आता अतुलने माईक आपल्या हातात घेतला आणि मानसीला पेंडसे सरांच्या पत्नी सौ आकांक्षा पेंडसे यांचा सर्व सहाध्यायांच्या वतीने सत्कार करावा असे सूचविले. सौ आकांक्षा पेंडसे मॅडम ह्या नुसत्या सरांच्या पत्नी म्हणून सर्व विद्यार्थ्यांच्या परिचयाच्या नव्हत्या तर त्यांच्या बरोबर सर्वांचे एक घरोब्याचे अनामिक नाते निर्माण झालेले होते. पेंडसे सर पुलंच्या चितळे मास्तरांप्रमाणेच आपल्या घरी विनामुल्य शिकवणी घेऊन प्रत्येक विद्यार्थ्याचा शैक्षणिक स्तर उंचावण्याचा प्रयत्न करायचे. त्या शिकवणीच्या वेळी बऱ्याचवेळा पेंडसे मॅडम या मुलांना गणित आणि सायन्स शिकवायच्या. कारण त्याही बी एस्सी फर्स्ट क्लास होत्या. एवढेच नाहीतर शिकवणीला येणा-या मुलांना त्या नेहमीच काहीतरी खाऊ द्यायच्याच.

मानसीने प्रथम पेंडसे मॅडमच्या गळयांत नाजुक बकुळीच्या फुलांचा हार घातला. त्यानंतर त्यांच्या हातात त्यांच्या गो-या रंगाला शोभेल अशी पैठणी आणि नारळ दिला. शेवटी पेढ्यांचा बॉक्स देऊन त्यांच्या वाकुन पाया पडली. तिलाही खूपच गहीवरुन आले परंतु तिने आणि पेंडसे मॅडम दोघांनीही मनाला आवर घातला.

अशाप्रकारे सर्व आजी आणि माजी गुरुजनांची कृतज्ञता व्यक्त करुन शेवटी घनश्यामच्या द्वारे श्री श्रीपती पवार यांचीही कृतज्ञता व्यक्त करण्यांत आली. परत एकदा मानसीने समारंभाचे

सूत्रसंचालन आपल्या हातात घेतले. ती म्हणाली, तर माझ्या मित्र मैत्रिणींनो आता आपला वर्गबंधु घनश्याम देसाई आजच्या या आपल्या संमेलनाची संकल्पना कशी सूचली, ती प्रत्यक्षात कशी आणली आणि या संमेलनाच्या माध्यमातुन आपण आपल्या या विद्यामदिरासाठी काय करु शकतो या विषयी सविस्तर विवेचन करतिल.

त्यानंतर घनश्यामने पोडियमवर येऊन माईक आपल्या हातात घेतला. त्यानंतर त्याने अजय, अतुल आणि मानसी यांच्या सोबत आपण कसे भेटलो. बोलता बोलता या संमेलनाची कल्पना कशी पुढे आली. त्यानंतर व्हॉटस् अँप आणि फेसबुकच्या माध्यमातुन सगळयांशी संपर्क कसा झाला याचे सविस्तर कथन करुन शेवट आजचा समारंभ कसा आयोजित केला याचेही विवेचन केले. आता मुद्दा असा आहे की आपण सगळे क्लासमेट ब-याच वर्षांनी एकत्र आलो आहोत. त्या आपल्या एकत्र येण्याने आपल्याला काहीतरी भरीव करता येईल का? याचा आपल्याला विचार करायचा आहे. मी या शाळेचा नुसता माजी विद्यार्थीच नाहीतर मी शाळेचा एक संचालक देखिल आहे. आपण आपल्या विद्यार्थिदशेतल्या आठवणी परत अनुभवायच्या दृष्टीने एकत्र आलो आहोत. तो आनंद तर आपण घेत आहोत आणि परत परत घेत राहुया ही माझी मनापासुनची इच्छा आहे. त्या अर्थाने आजचे आपले हे पहिले संमेलन आहे. आपण असेच परत परत भेटत रहाणार आहोत.

आपले हे हायस्कूल सन १९९० मध्ये स्थापन झाले. सुरवातिला फक्त पाचवीचा वर्ग होता. त्यानंतर दरवर्षी एक एक वर्ग वाढत गेला. १९९५ साली दहावीची आपली पहीली बॅच माध्यमिक शालांत परिक्षेसाठी सज्ज झाली. दरम्यानच्या काळात भगवान परशुरामाच्या एका भक्ताने आपली सध्या ज्या टेकडीवर आपले हे हायस्कूल उभे आहे ती सर्व जमिन हायस्कूलला दान दिली. त्याच बरोबर इमारती साठी काही रोख रक्कमही दिली. त्या रक्कमेमध्ये लोकवर्गणीची भर घालुन ही इमारत तयार झाली आहे.

सध्याचे युग हे डिजीटल युग आहे. त्या दृष्टीने नवीन पिढीला त्याचे धडे शाळेंतुनच मिळायला हवेत. त्या करिता आपल्या हायस्कूलकडे सुसज्ज असे संगणकांचे संच अथवा लॅपटॉप हवे आहेत. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी लागणार आहे. आपण त्यात आपण आपला खारीचा वाटा उचलु शकतो काय? याचाही विचार आपण करुया. आपल्या हायस्कूल साठी, आपल्या पुढील पिढीसाठी आपण काहीतरी करायला पाहीजे. त्याकरीता आता आपण जेव्हा थोड्यावेळाने भोजनाकरीता एकत्र जमु तेव्हा या गोष्टीं संबधाने अनौपचारीक चर्चा करुया. आता आपण या

सभागृहातिल कार्यक्रम स्थगित करुन आपल्या वर्गात एकत्र जमुया. आपल्या त्या वेळच्या बेंचवर बसुन थोडावेळ परत दहावीतले ते दिवस अनुभवुया. आता परत एकदा प्रार्थनेचा तास संपुन वर्गात जाण्याची बेल होईल. तेव्हा आता परत वर्गात भेटुया. प्रत्येकाने आपापले त्याकाळातले बेंच शोधुन त्यावर बसायचे व पुन:प्रत्ययाचा आनंद घ्यायचा आहे.

*******

## भाग ३

आज २१ वर्षांनी परत एकदा सर्व वर्गमित्र आपल्या त्याच वर्गात आले होते. वर्गामध्ये काळानुरुप बदल झाला होता. परंतु खिडक्या, दरवाजे आणि ब्लॅक बोर्डची जागा तीच होती. वर्गशिक्षकांची टेबल खुर्चीची जागाही तिच होती. फक्त बदलले होते ते आज वर्गात आलेले विद्यार्थी. ते देखिल शरिराने बदलले होते परंतु मनाने मात्र ते आज २१ वर्षापूर्वीच्या काळात गेले होते. आजच्या दिवसापुरता तिथे एकच बदल झालेला होता. तो म्हणजे वर्ग पताकांनी सजवलेला होता. वर्गाच्या दाराला फुलांचे तोरण बांधलेले होते. वर्गाच्या बाहेरील पॅसेजमध्ये १९९५ च्या विद्यार्थ्यांचे स्वागत करणारी रांगोळी काढलेली होती. वर्गाच्या फलकावर देखिल १९९५ च्या जुन्या सर्व वर्गसदस्यांचे वर्गातर्फे स्वागत करत असल्याचा मजकुर लिहिलेला होता.

प्रत्येकाने आपापली त्यावेळची जागा पटकावली होती. सर्वांच्या आपापल्या बाकावरच्या जोडीदारा बरोबर गप्पा सुरु झाल्या होत्या. तेवढ्यांत कोणीतरी हळुच कुजबुजले अरे, सर आले! सर आले!! त्या कुजबुजण्याच्या आवाजाने खरोखरच परत २१ वर्षांनी सर्वजण एकदम गप्प झाले. आणि वर्गात पिन ड्रॉप सायलेन्स झाली. इतके सर्वजण मनाने त्या काळात गेले होते. अर्थात खरोखरच त्यांच्या त्यावेळच्या सरांनी श्री विश्वास जोशी सरांनी वर्गात नाट्यमय रीतीने प्रवेश केला. आणि परंपरे प्रमाणे सर्व विद्यार्थी उठुन उभे राहीले.

विश्वास जोशीसर अजुनही त्या हायस्कूलमध्ये कार्यरत होते. अजुन दोन वर्षांनी ते सेवानिवृत्त होणार आहेत. जोशी सर आपल्या नेहमीच्या जागेवर स्थानापन्न झाल्यावर त्यांनी प्रत्येकाची आस्थेने चौकशी केली. प्रत्येकाच्या कौटुंबिक स्थितीविषयी जाणून घेतले. गेल्या २१ वर्षांत हायस्कूलमध्ये कोणकोणते आणि कसे बदल झाले त्याची माहीती सर्वांना दिली.

त्यानंतर मधल्या सुटीची बेल झाली. सर्वांना शाळेच्या माध्यान्ह भोजन गृहांत जमा होण्याच्या सूचना देण्यांत आल्या. शाळेचे माध्यान्ह भोजनगृह ही संकल्पनाच सर्वांना नविन होती. परंतु परशुराम हायस्कूलची ती एक खासियत होती. भोजनगृहात स्वतंत्र पाकगृह आणि कोठीघर देखिल बांधलेले होते. भोजनगृहामध्ये अन्नाची भांडी ठेवण्यासाठी ओटे बांधले होते. भोजनास बसण्यासाठी रांगा आखलेल्या होत्या.

आज माजी विद्यार्थी संमेलना निमित्ताने भोजनगृहात थोडा बदल केला होता. भोजन गृहामध्ये कॅटरर् मार्फत जेवण मागवले होते. त्याने आणलेली पदार्थांची भांडी ओट्यांवर मांडली होती. त्याने आपला स्वरुची भोजनाचा संच तेथे लावला होता. हॉलमध्ये दहा टेबल खुर्च्यांचे सेट

मांडले होते. सर्वजण आपापल्या रुचीप्रमाणे जेवण वाढुन घेत होते आणि फिरत फिरत जेवण करत होते. जेवता जेवता चर्चा करत होते. निरनिराळ्या विषयावर काही ठोस निर्णय घेण्याचा प्रयत्न करत होते.

सहभोजनानंतर परत सर्वजण साने गुरुजी सभागृहात एकत्र जमले. परत एकदा मानसीने कार्यक्रमाचे सूत्र आपल्या हातात घेतले. परत एकदा सर्वांचे हार्दिक स्वागत करुन तिने आता आपल्या सहाध्यायांना आपल्या आजच्या कार्यक्रमाबद्दलच्या भावना थोडक्यांत व्यक्त कराव्यात असे सूचविले. तिच्या सूचने नुसार त्यांचा वर्गबंधु श्री इस्माईल खेडेकर संमेलना बाबतच्या आपल्या भावना व्यक्त करण्याकरीता स्टेजवर दाखल झाले. त्यांच्या बॅचमधले ते एक स्कॉलर होते. त्यांचे वैशिष्ट म्हणजे त्यांना संस्कृत मधले प्रतिष्टेचे जगन्नाथ शंकरशेट पारितोषक मिळाले होते. सध्या ते दुबई येथे आपला स्वत;चा व्यवसाय सांभाळत होते. आजच्या संमेलनाकरीता ते खास दुबईवरुन आले होते.

त्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना ते म्हणाले, आज २१ वर्षांनी परत एकदा शाळेतील ते दिवस आठवताना खूप छान वाटत होते. खरोखरच आज मी परत एकदा १०वीतला विद्यार्थी झालो होतो. माझे असे मत आहे की, असा कार्यक्रम दरवर्षी करावा. मघाशी बोलता बोलता घनश्यामने जे सुचवले त्याच्याशी मी पूर्ण सहमत आहे. एवढेच नाहीतर शाळेची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी काय करता येईल या संबधी आम्ही मित्रांनी सखोल चर्चा केली आहे. त्याचा तपशिल अतुल देईल. माध्यान्ह भोजनगृहात आपण जेवत असताना समोर भिंतीवर लिहिलेले **“आपण येथेष्ट जेवणें| उरलें तें अन्न वाटणें |परंतु वाया दवडणें| हा धर्म नव्हे ।। तैसें ज्ञानें तृप्त व्हावें| तेंचि ज्ञान जनास सांगावें | तरतेन बुडों नेदावें| बुडतयासी ||”** हे समर्थ रामदास स्वामींचे वचन वाचले. आता मला येथे त्या वचनाचा उल्लेख करावासा वाटतो. माझ्या मते आपण सर्वांनी आता पुरेसे कमावले आहे. आपल्या दैनंदिन गरजा, प्रापंचिक जबाबदा-या सांभाळुन आपल्याला जेवढे शक्य असेल तेवढा भाग आपण आपल्या या आपल्या ज्ञानदात्री माऊलीला कृतज्ञता म्हणून अर्पण करुयात. आणि असेच परत परत भेटत राहुया.

इस्माईल खेडेकरांनी आपल्या भावना व्यक्त केल्या नंतर अनेकांनी आपल्या आजच्या संमेलना बाबतच्या भावना व्यक्त केल्या. त्यामध्ये प्रत्येकाचा सर्वसाधारण सूर तसाच होता. प्रत्येकालाच आपण आपल्या या विद्यामंदीराकरीता काहीतरी करुया असे वाटत होते. आता कोणी भावना

व्यक्त करायला पुढे येत नाही असे पाहिल्यावर अतुल स्टेजवर दाखल झाला. आणि त्याने सर्व माजी विद्यार्थ्यांच्या वतीने बोलायला सुरवात केली.

माझ्या आदरणिय गुरुजनांना, माझ्या ज्ञानमाऊली विद्यामंदिराला आदरपूर्वक वंदन करुन आता मी आम्हा माजी विद्यार्थ्यांचा प्रतिनिधी म्हणून आम्हा सर्वांचे विचार येथे मांडणार आहे. आम्ही सर्वजण आज खूप आनंदात आहोत. आम्हाला परत आमचे पूर्वीचे दिवस आज अनुभवायला मिळाले. शाळेच्या सर्व स्टाफने आम्हाला खूपच सहकार्य केलेले आहे. आमच्या विनंतीला मान देऊन प्रकृती साथ देत नसताही आमच्या प्रेमापोटी श्री पेंडसेसर व सौ पेंडसे मॅडम आवर्जुन उपस्थित राहीले. त्याचप्रमाणे आपले सर्वांचे लाडके श्रीपती पवारकाका देखिल खास या कार्यक्रमाकरीता हौसेने पठाणकोट येथुन येथे आले त्याबद्दल त्यांचे आभार मानणे हा कृतघ्नपणा होईल. त्यांचे हे प्रेम आमच्यावर असेच कायम राहो हीच त्या परशुरामाकडे प्रार्थना.

घनश्याम देसाई हा आपला वर्गबंधू, तो येथेच रहात असल्याने आपण या संमेलनाची सगळीचे कामे आपण त्याच्या गळयांत टाकली त्यानेही कोणतीही कुरकुर न करता ती आनंदाने पार पाडली. मी हा आभार प्रदर्शनाचा कार्यक्रम करीत नाही. परंतु ओघानेच आले म्हणून हे उल्लेख केले.

मगाशी जेवताना आमची अनेक गोष्टींबाबत तपशिलवार चर्चा झाली. त्यात आपले वर्गबंधू-भगिनी तर होतेच. त्याचबरोबर आपल्या हायस्कूलचे सध्याचे मुख्याध्यापक श्री आनंद लिमयेसर आणि हायस्कूलच्या संचालक मंडळाचे सदस्य देखिल होते. आपल्या या विद्यामंदिराच्या प्रगति आणि उन्नती साठी आपल्याला काय करता येईल या बाबत आमचे बोलणे झाले. आपल्या हायस्कूलला प्रामुख्याने इमारतीच्या विस्तारीकरणाची आणि आधुनिकीकरणाची गरज आहे. त्याचबरोबर डिजीटल युगाशी जुळवुन घेण्यासाठी तातडीने काही संगणक संच अथवा लॅपटॉपची गरज आहे. त्याचप्रमाणे आधुनिक दळणवळणाची जोड येथे उपलब्ध करुन घेण्याची गरज आहे. या सर्व बाबींसाठी मोठ्या निधीची गरज आहे.

या सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन आम्ही असे ठरविले आहे की “गुरु दक्षिणा ट्रस्ट” या नावाचा ट्रस्ट स्थापन करायचा आणि त्या ट्रस्टच्या माध्यमातुन ही सर्व विकास कामे करायची. या ट्रस्टचे अध्यक्ष आपले घनश्यामदादा असतिल, आपल्या हायस्कूलचे मुख्याद्यापक या ट्रस्टचे सेक्रेटरी असतिल. तसेच इस्माईल खेडेकर, मी, उज्वला, मानसी आणि अजय या ट्रस्टचे सदस्य असतिल. हा ट्रस्ट रजिस्टर करुन घेण्याची जबाबदारी घनश्यामने स्विकारली आहे. त्या ट्रस्टला

दिलेली रक्कम आयकर मुक्त रहाण्यासाठी आवश्यक असणारी कार्यवाही करण्याची जबाबदारी मी घेत आहे. तेव्हा मी माझ्या सर्व सहाध्यायींना विनंती करतो की आपण स्वत: तर आपले योगदान द्याच, परंतु आपल्या मित्रपरिवारामध्ये जे कोणी या पवित्र कार्याला मदत करु शकतिल त्यांनाही आवाहन करुन आपला हा कृतज्ञता निधी जास्तित जास्त कसा वाढेल हे बघावे.

आताच माझ्या हातात इस्माईल खेडेकर यांनी पांच लाखाचा, अजय, मानसी, घनश्याम आणि मी प्रत्येकी तिन लाखांचे चेक असे एकुण सतरा लाखांचे चेक आलेले आहेत. त्याच प्रमाणे माझ्या एका क्लायंट कंपनीने आपल्या हायस्कूलला १५ लॅपटॉप देण्याचे मान्य केले आहे. या सर्व घोषणा  ऐकताच संपूर्ण सभागृह टाळ्यांनी दणाणुन गेले.

आता आपल्या हायस्कूलचे मुख्याद्यापक श्री आनंद लिमयेसर आपले विचार व्यक्त करतिल. त्यानंतर आपले सहाध्यायी रमेश गांगल आभार व्यक्त करतील, नंतर राष्ट्रगीत होईल आणि आपला आजचा कार्यक्रम संपन्न होईल. परत कधी एकत्र जमायचे ते आपल्या सर्वांना आपल्या व्हॉटस् अँप ग्रुपवरुन कळविण्यांत येईल. कारण आपला हा ग्रुप चालुच रहाणार आहे. तेव्हा आता मी श्री लिमये सरांना विनंती करते की, त्यांनी आपले मार्गदर्शन आम्हाला करावे. असे म्हणून मानसीने माईक श्री लिमये सरांकडे दिला.

माननिय श्री पेंडसेसर आणि मॅडम, त्याचप्रमाणे मंचावर बसलेल्या माझ्या आजी आणि माजी सहकरी, हायस्कूलचे संचालक मंडळातिल सर्व सदस्य आणि सर्व माजी विद्यार्थ्यांना अभिवादन करुन मी आपणा सर्वांना येथे उपस्थित राहिल्याबद्दल धन्यवाद देतो. आपण सर्वजणच या विद्यामंदिराचे भक्त आहोत. या विद्यामंदिराचा जिर्णोद्धार व्हावा म्हणून आपण जो प्रयत्न करता आहात  त्या बद्दल मी या संस्थेचा प्रतिनिधी म्हणून आपले आभार व्यक्त करत आहे. आपले या संस्थेवरचे प्रेम असेच वाढत राहो. आपले या विद्यामंदिरासोबतचे ऋणानुबंध असेत वृद्धींगत होवोत हीच त्या सरस्वती चरणी प्रार्थना. आपण सर्वांनी असेच वारंवार येथे येऊन आपल्या संस्थेची प्रगती पहात रहावी अशी मी आपणाला विनंती करुन मी आपली रजा घेतो. शेवटी एवढेच सांगतो “पुनरा गमनायच”

लिमयेसरांच्या भाषणानंतर श्री रमेश गांगल यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. त्यानंतर राष्ट्रगीत होऊन कार्यक्रम संपन्न झाल्याचे जाहिर करण्यात आले.

## भाग ४

परशुराम हायस्कूलच्या प्रांगणात आज उत्साही वातावरण होते. हायस्कूलच्या पूर्ण आवाराला वीजेची रोषणाई करण्यांत आली होती. आज हायस्कूलच्या संगणक कक्षाचे उद्घाटन आणि विस्तारीत इमारतीचा पायाभरणी समारंभ आयोजीत केला होता. त्या समारंभाला जोडूनच माजी विद्यार्थ्यांचे तिसरे स्नेहसंमेलन आयोजित करण्यांत आले होते. यावर्षी १९९५, १९९६ आणि १९९७ च्या दहावीच्या वर्गांचे एकत्रीत स्नेहसंमेलन होणार होते.

या वर्षीच्या या सोहळयाचे वैशिष्ट हे होते की, १९९७ च्या दहावीच्या वर्गातील माजी विद्यार्थि श्री विश्वनाथ सावंत हे चिपळुण लोकसभा मतदार संघाचे खासदार होते. त्यांच्या पुढाकाराने शाळेच्या इमारतीला शासनातर्फे भरीव मिळाली होती.

हायस्कूलच्या प्रांगणात मोठा मंडप घातला होता. स्टेजवर मुख्याध्यापक श्री लिमये सर, खासदार विश्वनाथ सावंत, इस्माईल खेडेकर, “गुरु दक्षिणा ट्रस्ट” चे अध्यक्ष घनश्याम देसाई, सदस्य अतुल उज्वला, मानसी आणि अजय उपस्थित होते.

मंडपात १९९५, १९९६ आणि १९९७ च्या दहावीचे विद्यार्थी, शाळेतिल सध्याचे विद्यार्थि, स्टाफ उपस्थित होते. सगळयांचा उत्साह नुसता ऊतु जात होता. लाऊडस्पिकरवर मंद स्वरात सनई चालू होती. मागिल संमलनातिल अनुभवाचा विचार करुन या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मानसीने करावे असे ठरविले होते त्याप्रमाणे तिने माईकचा ताबा घेतला आणि कार्यक्रमाची सुरवात करण्याच्या दृष्टीने उभी राहिली.

मानसीने स्टेजवर ठेवलेल्या सरस्वतीच्या प्रतिमेला वंदन करुन कार्यक्राची सुरवात केली. स्टेजवर उपस्थित श्री लिमयेसर, आपले आवडते खासदार श्री विश्वनाथ सावंत, “गुरु दक्षिणा ट्रस्ट” चे अध्यक्ष आणि सर्वप्रतिनिधी, या हायस्कूलचे सर्व माजी आणि विद्यार्थी बंधू भगिनिंनो आपले आजच्या विशेष कार्यक्रमांत स्वागत करीत आहे. आपल्या आजच्या कार्यक्रमाची सुरवात आपण सरस्वतीच्या पूजनाने करणार आहोत. तेव्हा मी सर्व मान्यवरांना विनंती करते की, त्यांनी दिपप्रज्वलन करुन सरस्वतीच्या प्रतिमेला पुष्पहार घालुन आजच्या कार्यक्रमाची सुरवात करावी.

सर्व मान्यवरांनी दिपप्रज्वलन आणि सरस्वती पूजन केल्यानंतर मानसीने  लिमयेसरांना विनंती केली की, त्यांनी आजच्या कार्यक्रमाच्याबद्दल आम्हाला माहिती द्यावी.

मानसीच्या विनंती नंतर लिमये सर पोडीयम समोर बोलायला उभे राहिले. आजच्या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी या हायस्कूलचे माजी विद्यार्थी खासदार श्री विश्वनाथ सावंतसर, माजी विद्यार्थि कृतज्ञता समितीचे सर्व पदाधिकारी आणि उपस्थित सर्व आजी आणि माजी विद्यार्थी आपले आजच्या विशेष कार्यक्रमात परशुराम हायस्कूलच्या वतीने मी आपले स्वागत करतो. आज आपल्या हायस्कूलच्या दृष्टीने महत्वाचा दिवस आहे. दोन वर्षापूर्वी स्थापन झालेल्या “परशुराम हायस्कूल माजी विद्यार्थी कृतज्ञता निधी” या माजी विद्यार्थ्यांनी स्थापन केलेल्या संस्थेने आपल्या हायस्कूलचा कायापालट करायचा निर्धारच केला होता. त्याचा परिणाम म्हणून आज आपण आजचा दिवस पाहत आहोत. या संस्थेने गेल्या तीन वर्षांत शाळेला डिजिटल करुन टाकले. या शिवाय सुमारे एक करोड रुपयांचा निधी या संस्थेने आपल्या हायस्कूलच्या कायापालटाकरीता जमा केला आहे. त्याचाच एक भाग म्हणून आपण आज आपल्या हायस्कूलच्या नविन इमारतीच्या भूमीपूजनाचा कार्यक्रम आयोजीत केला आहे. या नविन इमारतीत सुसज्ज प्रयोगशाळा असेल. स्वतंत्र संगणक कक्ष असेल. मुलांना खेळण्याकरीता इनडोअर आणि आउटडोअर गेम्स उपलब्ध असतिल.

आज आपण आपल्या या नवीन प्रकल्पाची सुरवात करीत आहोत. त्याकरीता ज्यांनी ज्यांनी आपले योगदान दिले आहे, त्यांना या संस्थेतर्फे धन्यवाद देतो. आता मी आपल्या खासदार साहेबांना विनंती करतो की त्यांनी आपल्या नवीन वास्तुच्या जागेचे भूमीपूजन करुन पहिली कुदळ मारावी.

त्यानंतर सर्वजण इमारतीच्या नियोजित जागेत गेले तिथे खासदार साहेबांच्या हस्ते विधिवत भूमीपूजन केले गेले. पूजन झाल्यावर खासदार साहेबांनी पहिली कुदळ मारली. त्यानंतर “गुरु दक्षिणा ट्रस्ट” च्या प्रतिनिधींनी देखील पूजन करुन कुदळ मारली.

भूमीपूजनाचा कार्यक्रम संपन्न झाल्यावर परत सर्वजण परत स्टेजकडे गेले. परत मानसीने कार्यक्रमाचे सूत्र आपल्याकडे घेतले. ती म्हणाली, आता आपला भूमीपूजनाचा कार्यक्रम संपन्न झाला आहे. मी आता आपल्या खासदार साहेबांना आपले विचार मांडण्याची विनंती करते.

मानसीच्या विनंती नंतर खासदार सावंत साहेब पोडीयमकडे गेले. आपल्या हायस्कूलचे प्रिन्सिपॉल श्री लिमये सर, माजी विद्यार्थी कृतज्ञता निधी ट्रस्टचे पदाधिकारी, उपस्थित सर्व आजी माजी विद्यार्थी मित्र मैत्रिणींनो! आज मला माझ्याच हायस्कूलच्या नूतन वास्तुच्या भूमीपूजनाची संधी मिळाली त्याबद्दल खूप धन्यता वाटत आहे. मी बाहेर जरी खासदार असलो तरी या हायस्कूलच्या परिसरांत मी एक विद्यार्थीच आहे. सर्व माजी विद्यार्थ्यांच्या सहभागाने आज

आपल्या या हायस्कूलचा कायापालट होत आहे याबद्दल मला खूप आनंद होत आहे. आपल्या गुरुकुलाबददल कृतज्ञता वाटणे आणि ती कृतज्ञता कृतीत आणणे यात वास्तविक खूप फरक असतो. परंतु आपल्या या माजी विद्यार्थ्यांनी ती कृतज्ञता कृतीत उतरवीली आहे. हा आपला आदर्श सर्वच शाळांच्या विद्यार्थ्यांनी समोर ठेवला तर आपल्या शिक्षण संस्थांना कुणाकडेही हात पसरायची जरुरी पडणार नाही. त्याचा परिणाम आर्थिक मदत दिली म्हणून दात्यांच्या मर्जीनुरुप वागावे लागणार नाही. सर्व शिक्षण संस्था स्वायत्त होतील. त्यांना स्वत:च्या धोरणांच्या बाबतित कोणतीही तडजोड करावी लागणार नाही. मला भूमीपूजनाकरीता संधी दिल्याबद्दल मी आपल्या सर्वांचे आभार मानुन मी माझे चार शब्द पुरे करतो. धन्यवाद.

आता आपल्या माजी विद्यार्थ्यांच्या वतीने आपल्या “गुरु दक्षिणा ट्रस्ट” चे अध्यक्ष श्री घनश्याम देसाई यांना आपल्या सर्वांच्या मनांतिल विचार व्यक्त करायची विनंती करते.

मानसीच्या विनंती नंतर घनश्याम देसाई पोडीयमपाशी आले तेथिल माईक काढुन आपल्या हातात घेतला आणि पोडीयमसमोर न उभे रहाता स्टेजवर उभा राहून बोलायला सुरुवात केली. माझ्या हायस्कूलचे प्रिन्सिपॉल श्री लिमये सर, आजच्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे खासदार साहेब आणि माझ्या सर्व माजी आणि आजी विद्यार्थी मित्रांनो आज मी आपल्या सर्वांच्या मनातले विचार या ठिकाणी व्यक्त करण्याकरीता ऊभा आहे.

आपणा सर्वांना माहित आहेच, तिन वर्षांपूर्वी आपण पहिले माजी विद्यार्थी संमेलन आयोजित केले होते. त्यात आपण सर्वांनी या आपल्या विद्यामंदिराचा कायापालट करायचा निश्चय केला. त्याला हायस्कूलच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी दुजोरा दिला. श्री लिमयेसरांनी आपल्या या ट्रस्टच्या सचीव पदाची जबाबदारी घेण्याचे मान्य केले. त्यावेळी ठरविल्याप्रमाणे आपण शाळेला आवश्यक असणारे संगणक उपलब्ध करुन दिले. आपल्या आवाहनाला इतका प्रतिसाद मिळाला की, आपल्या हायस्कूलची संगणकाची गरज पूर्ण करुन आपण आपल्या चिपळुण तालुक्यातिल सर्व प्राथमिक शाळांना प्रत्येकी एक संगणक देऊ शकलो.

आपले सहाध्यायी आणि या भागातले खासदार सावंत साहेब यांच्या विशेष प्रयत्नाने आपल्याला आपल्या हायस्कूलच्या विस्तारित इमारतीकरीता योग्य त्या परवानग्या तर मिळाल्याच शिवाय मुबलक अनुदानही प्राप्त झाले आहे. त्यामुळे आपला गुरुदक्षिणा ट्रस्ट आणि शासनाचे अनुदान यांच्या भरीव आर्थिक बळावर लवकरच नवीन इमारत सिध्द होईल. एवढे करुन आपली गुरु दक्षिणा पूर्ण झाली का तर नाही. एवढ्या मोठ्या शिक्षणसंकुलाची देखभाल दिवाबत्ती याकरिता देखील खूप निधीची आवश्यकता पडणार आहे. त्याकरीता देखिल आपण

सज्ज राहिले पाहिजे, ही जाणिव करुन देऊन मी आपल्या वतीने बोलत असलेले मनोगत पूर्ण करतो.

घनश्यामचे मनोगत पूर्ण होताच मानसीने माईकचा ताबा घेतला. ती म्हणाली आता आपले सहाध्यायी आणि गुरुदक्षिणा ट्रस्टचे संचालक श्री ईस्माईलभाई आपल्याला काही प्रेमाच्या सूचना करु इच्छितात. तेव्हा मी आता त्यांना येथे त्यांचे विचार व्यक्त करण्यासाठी आमंत्रित करते.

लगेचच इस्माईल भाईंनी माईक उचलले आणि पोडियम समोर बोलायला उभे राहिले. माननिय लिमये सर, माझ्या सर्व सहाध्यायी बंधु आणि भगिनिंनो, आपण तिन वर्षापूर्वी केलेला संकल्प नवीन इमारतीच्या रुपाने साकार होताना आता आपल्याला दिसतो आहे. आताच घनश्यामने सांगितले त्या प्रमाणे नवीन शिक्षण संकुल उभे राहिले की, त्याच्या देखभालीचा खर्च खूप वाढणार आहे. तेव्हा आपल्याला त्यातिल आपला खारीचा वाटा उचललाच पाहिजे. एक सुभाषित आहे, **एकमप्यक्षरं यस्तु गुरु शिष्ये निवेदयेत् । पृथिव्यांनास्ति तद् द्रव्यं यद्दत्वा ह्यनृणी भवेत ।।** याचा अर्थ असा आहे, गुरुंनी आपल्याला एकजरी अक्षर शिकवले तर त्याची भरपाई पृथ्वीवरील सर्व धन खर्च केले तरी होणार नाही. आपण तर आपल्या या विद्यामंदिरात सहावर्ष विद्यादान स्विकारत राहिलो. त्या स्विकारलेल्या दानाचे मोल आपण करु शकत नाही. आपल्या आयुष्याला वळण देणाऱ्या महत्वाच्या टप्प्यावर आपण येथे विद्या शिकलो आहोत. तेव्हा माझ्या मनांत एक योजना आहे, आपल्यापैकी बारा विद्यार्थ्यांनी एकेका महिन्याचे विजेचे बील भरावे.

समर्थ रामदास स्वामी यांनी दास्यभक्ती या समासात **देवाचें वैभव संभाळावें| न्यूनपूर्ण पडोंचि नेदावें |चढतें वाढतें वाढवावें| भजन देवाचें ||३||** असे सांगितले आहे. आपले हे हायस्कूल म्हणजे आपले दैवत आहे. त्याचे वैभव वाढविणे जर काही कमी पडत असेल ते त्याची पूर्तता करणे हे आपले त्या दैवताचे भक्त म्हणून आपले कर्तव्यच आहे. ज्याला ज्याला जशी जशी मदत करणे शक्य आहे त्याप्रमाणे त्याने आपले योगदान द्यावे. आपण या हायस्कूल मधिल गरजु विद्यार्थ्यांना दत्तक घेऊन त्याच्या पाचवी पासुन अगदी तो पदवी घेईपर्यंतच्या आर्थिक गरजा पूर्ण करु शकतो. या करीता आपले लिमये सर मदत करतील. आपली मदत खऱ्या गरजुला मिळावी या करीता शाळेचे व्यवस्थापन आपल्याला मार्गदर्शन करेल. या शिवाय हायस्कूलला कोणती गरज आहे हे देखिल शाळेचे व्यवस्थापन आपल्याला सांगेल. याकरीता गुरुदक्षिणा या नावाचे एक अँड्रॉइड अँप आपण तयार केले आहे. त्याची लिंक आपल्याला व्हॉटस् अँपवर पाठविण्यांत येईल. यामध्ये आपल्याला सर्व अपडेटस मिळतिल त्याप्रमाणे आपण आपला निधी किंवा वस्तू हायस्कूल कडे

पाठवु शकु. अशाप्रकारे मी माझे विचार आपल्या समोर ठेवले आहेत. त्या सूचनांचा आपण विचार करुन योग्य ते कराल याची खात्री आहे. असे म्हणून इस्माईल भाईंनी आपले भाषण संपवले.

आता रमेश गांगल आभार प्रदर्शन करतील. त्यानंतर पसायदान म्हटले जाईल. त्यानंतर सर्वांच्या अल्पोपहाराची सोय याच ठिकाणी केलेली आहे. सर्वांनी अल्पोपहार घेऊनच निरोप घ्यावा ही विनंती. अशाप्रकारे परशुराम हायस्कूलच्या नुतन वास्तुच्या भूमीपूजनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

***********

मित्रहो

पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात . ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

मंडळी!

वाचायला तर हवंच!

पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...

...आणि स्वतःही लिहायला हवं.

www.esahity.com

esahity@gmail.com